नियमित फौजदारी खटला नं. ३१०/२०२२
निशाणी- २४

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ चा जबाब.

मी शपथेवर कथन करतो की,
माझे नांवः- महेश बाळासाहेब चिंतामणी
वयः- ३१ वर्षे, धंदाः- व्यवसाय
राहणार- माळीवाडा, अहमदनगर.

सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्री. ए. एस. यादव यांचेकडूनः-

१. दि. २७/०१/२०२२ रोजी सायबर पोलीसांनी सायबर पोलीस स्टेशन येथे बोलाविले होते. शुभम गाडेकर याने ओप्पो कंपनीचा मोबाईल हजर केला होता. मोबाईल आमच्या समक्ष जप्त करण्यात आला. दुसरा पंच विशाल ठाकुर होता. पंचनामा माझ्या समक्ष लिहिला, पंचनाम्यावर माझी आणि दुस-या पंचाची आणि आरोपीची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि. २५ देण्यात आली. आरोपी आज न्यायालयात हजर आहे. जप्त मोबाईल मी ओळखु शकतो. आता मला लिफाफ्यावरील स्लीप दाखविली, त्यावर माझी सही आहे. आता मला मोबाईल दाखविला तो तोच आहे. त्यास अर्टिकल 'अ ' देण्यात आले.

उलट तपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्रीमती. डी. आर. टाक यांचेकडूनः-

२. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस निरीक्षक मला नेहमी पंचनाम्यासाठी बोलवत असतात. हे म्हणणे खरे आहे की, काही केसेसमध्ये पोलीस जप्तीची प्रक्रिया आदि पूर्ण करुन ठेवतात त्यांनतर आम्ही जाऊन सही करतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी आदि जप्ती पंचनामा केला होता त्यानंतर माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांचा नेहमीचा पंच आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष,

RAJENDRA SHANTINATH ROTE
Digitally signed by RAJENDRA SHANTINATH ROTE DN: cn=RAJENDRA SHANTINATH ROTE, ou=BOMBAY HIGH COURT, CID - 6951313, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN Date: 2025.03.06 17:34:26 +0530

( राजेंद्र शां. रोटे )
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

दि. ०६/०३/२०२५